MHGA080001112026

**सिरोंचा येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, सिरोंचा**
**श्री. उन्मेश बा. श्रीराम, यांच्या न्यायालयांत,**
संक्षिप्त फौजदारी खटला क्र.६६/२०२६, सरकार .वि. शिवकुमार मारगोनी,

**निशाणी -०४.**

| **आरोपांचा आशय व तपशील** | | |
|---|---|---|
| १. | **गुन्हा घडला तारीख** | ०३.०३.२०२६ रोजी १३.०५ ते १३.३५ वाजता<br>मौजा-असरअल्ली बस स्टॅंड,<br>तालुका-सिरोंचा, जिल्हा-गडचिरोली. |
| २. | **खबर दिल्याची तारीख** | ०३.०३.२०२६ |
| ३. | **खबर देणा-याचे नांव** | योगेश देशमुख, पोलीस शिपाई, ब.नं.६०५८९,<br>पोलीस स्टेशन, **असरअल्ली,**<br>जिल्हा-गडचिरोली. |
| ४. | **आरोपीचे नांव** | **शिवकुमार क्रिष्णमुर्ती मारगोनी,**<br>वय ५५ वर्षे, व्यवसाय- वाहन चालक,<br>ह. मु. राहणार-सिरोंचा, तालुका-सिरोंचा,<br>जिल्हा-गडचिरोली.<br>मुळ राहणार- मुलगुपल्ली, मंडल-मुत्ताराम,<br>जि.जयशंकर भुपालपल्ली, तेलंगणा राज्य. |
| ५. | **आरोपीत गुन्हे** | |
| | ज्याअर्थी, उपरोक्त दिवशी, वेळी व ठिकाणी, तुम्ही तुमच्या ताब्यातील वाहन क्र.MH-33-0788 मधुन मद्य प्राशन करुन वाहन चालविले त्याअर्थी तुम्ही, मोटार वाहन अधिनियम, १९८८ दंडनिय कलम १८५ प्रमाणे गुन्हा केला असा तुमच्यावर आरोप आहे. | |
| **ता.१४.०३.२०२६.** | | **समक्ष** |
| | | **स्वा/-**<br>**उन्मेश बा. श्रीराम**<br>**प्र.वर्ग न्या.दं. सिरोंचा.** |

| | **आरोपीचे प्रतिकथन/कबुली** |
|---|---|
| **प्रश्न क्र.१** | तुम्हाला दोषारोपांचा आशय समजला काय? |
| **उत्तर** | होय. |
| **प्रश्न क्र.२** | तुम्हाला पोलीस कागदपत्रांच्या नकला मिळाल्यांत काय? |
| **उत्तर** | होय. |
| **प्रश्न क्र.३** | तुम्हाला विधी सेवा केंद्राकडुन विधीज्ञ सेवा हवी आहे काय? |

| | |
|---|---|
| **उत्तर** | नाही. |
| **प्रश्न क्र.४** | तुम्हाला आरोपीत गुन्हे कबुल आहेत काय? |
| **उत्तर** | होय मला गुन्हा कबुल आहे. |

| **ता.१४.०३.२०२६.** | **समक्ष** |
|---|---|
| स्वा/-<br>............................<br>आरोपी ची सही/अंगठा | **स्वा/-** |
| | **उन्मेश बा. श्रीराम** |
| | प्र.वर्ग न्या.दं. सिरोंचा. |

**न्यायनिर्णय/आदेश**

(आज तारीख १४.०३.२०२६ रोजी पारित)

१. या खटल्यातील आरोपी आज हजर असुन त्याला मी उपरोक्त गुन्ह्याचा आशय (निशाणी क्र. ०४ स्पष्टपणे मराठीत समजावुन सांगितला आहे.

२. आरोपीने ठामपणे व स्पष्ट शब्दांत त्याचेवरील आरोप मान्य केला आहे. तशी पुरसिस त्याने दाखल केली असुन ती निशाणी क्र.०२ ला आहे. आरोपी कुठल्याही अगर कोणाच्याही दबावाविना गुन्हा कबुल करीत आहे याची मी खात्री केली आहे.

३. सबब, मी आरोपीचे गुन्ह्याबाबत कबुलीचे प्रतिकथन स्विकारुन आरोपीला मोटार वाहन अधिनियम, १९८८ चे कलम १८५ प्रमाणे दंडनिय कलमांसाठी दोषी मानत आहे.

४. या मोटार वाहन अधिनियम, १९८८ चे कलम १८५ प्रमाणे गुन्ह्यासाठी रक्कम रु. १०,०००/- द्रव्यदंड निर्धारित केलेला आहे. आरोपीने केलेल्या कथनांचा विचार करता आणि कमाल शिक्षेची मर्यादा पाहता, माझ्या मते, पुढील आदेश यथायोग्य आहे.

**आदेश**

१. आरोपी **शिवकुमार क्रिष्णमुर्ती मारगोनी** यांना फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम २५२ नुसार मोटार वाहन अधिनियम, १९८८ चे कलम १८५ प्रमाणे च्या गुन्ह्यांसाठी दोषी धरण्यांत येत आहे.

२. आरोपीने मोटार वाहन अधिनियम, १९८८ चे कलम १८५ प्रमाणे गुन्ह्या बाबत एकुण रूपये १०,०००/- (अक्षरी रुपये दहा हजार मात्र) इतका द्रव्यदंड अदा करावा, अशी शिक्षा त्यांना फर्माविण्यात येत आहे. दंड न भरल्यास आरोपीने १५ दिवस साधी कैद भोगावी असेही फर्माविण्यात येत आहे.

३. प्रकरण संपले.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by UNMESH BALU SHRIRAM
Date: 2026.03.16 14:27:07 +0530

**(उन्मेश बा. श्रीराम)**

ता.१४.०३.२०२६. प्रथम वर्ग न्यायदंडधिकारी, सिरोंचा.

**प्रमाणपत्र**

मी शपथेवर सांगतो की, पी. डी. एफ. न्यायनिर्णय/आदेशामधील मजकूर हा मुळ न्यायनिर्णय/आदेशातील मजकुराप्रमाणे शब्द-न-शब्द सारखा आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नाव | : | विठ्ठल विश्वांभर मिठ्ठेवाड<br>लघुलेखक (श्रेणी-३) |
| न्यायालयाचे नाव | : | दिवाणी व फौजदारी न्यायालय,<br>सिरोंचा. |
| न्यायनिर्णय/आदेशाची तारीख | : | १४/०३/२०२६. |
| मा.पिठासीन अधिकारी यांनी न्यायनिर्णय<br>/आदेशावर सही केल्याची तारीख | : | १४/०३/२०२६. |
| न्यायनिर्णय/आदेश अपलोड केल्याची तारीख: | | १६/०३/२०२६. |

Digitally signed by VITHAL VISHWAMBHAR MITHEWAD
Date: 2026.03.16 14:27:36 +0530

(विठ्ठल विश्वांभर मिठ्ठेवाड)
लघुलेखक (श्रेणी-३)
दिवाणी व फौजदारी न्यायालय, सिरोंचा.